आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२१ मे २०२६ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- पाच देशांचा दौरा यशस्वीरित्या पूर्ण करून प्रधानमंत्री काल नवी दिल्लीत परतले/ इटलीमधे उभयपक्षी व्यापक सहकार्यासाठी झाले महत्त्वाचे करार

- महामार्गांच्या आधुनिक बांधकामामुळे देशात दळणवळणाचं चित्र वेगानं पालटत असल्याचं केंद्रीय रस्तेवाहतूक मंत्र्यांचं प्रतिपादन

- ईबोला विषाणू प्रादुर्भावाबाबत आरोग्य सेवा महासंचालनालयाचा दक्षतेचा इशारा जारी.

आणि

- झारखंडमधे २७ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पाच देशांचा दौरा यशस्वीरित्या पूर्ण करून काल नवी दिल्लीत परतले. मोदी यांनी इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावर चर्चा केली. या दौऱ्यात भारत आणि इटलीने आपले संबंध विशेष सामरिक भागीदारीपर्यंत वाढवण्याची घोषणा करण्याबरोबरच व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, संरक्षण, स्वच्छ ऊर्जा आणि धोरणात्मक भागीदारी या क्षेत्रांमधील सहकार्य वाढविण्यावर या बैठकीत भर देण्यात आला. त्याचबरोबर दोन्ही देशांनी कृषी, महत्त्वपूर्ण खनिजे, आयुर्वेद, विज्ञान आणि तंत्रज्ञान, तसेच भारतीय परिचारिकांना भारतातून इटलीमध्ये ये-जा करण्यासाठी सुविधा देण्यासह इतर मुद्द्यांवरदेखील सामंजस्य करार केले.

दरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना रोम इथं अन्न आणि कृषी संघटनेच्या मुख्यालयात प्रतिष्ठेचे 'ॲग्रिकोला पदक' प्रदान करण्यात आलं. मोदी यांनी हा सन्मान भारतातले शेतकरी, पशुपालक, मत्स्यशेती करणारे बांधव, कृषी शास्त्रज्ञ आणि कामगारांना समर्पित केला. या सन्मानाबद्दल संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, गृहमंत्री अमित शहा, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मोदी यांचं अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

भारतीय उद्योगांना केवळ युरोपच नव्हे तर पूर्व भूमध्य सागरी, आखाती आणि उत्तर आफ्रिकेतल्या देशांची बाजारपेठ खुली करून देण्यासाठी सायप्रस साहाय्य करेल अशी ग्वाही सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टोदौलीदेस यांनी आज दिली आहे. ते आज मुंबईत भारत-सायप्रस उद्योग मंचा ला संबोधित करत होते. मुंबईत येत्या १ सप्टेंबर पासून सायप्रस व्यापार केंद्र सुरु करण्याची घोषणा निकोस यांनी यावेळी केली. सायप्रसकडे सध्या युरोपीय महासंघाच्या परिषदेचे अध्यक्षपददेखील आहे. त्यामुळे सायप्रसच्या सहकार्यासोबतच भारताला युरोपीय महासंघाचे सहकार्य देखील मिळेल असं निकोस यांनी यावेळी सांगितलं. यावेळी दोन्ही देशांमध्ये सहा सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

सायप्रसचं सहकार्य आणि मैत्रीचा लाभ भारताला दीर्घकाळापर्यंत मिळत राहील अशी आशा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली. महाराष्ट्रातल्या तरुण उद्योजकांनी, गुंतवणूकदारांनी, व्हेंचर फंड्स आणि विद्यापीठांनी या सहकार्याचा लाभ घेत प्रगती करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

देशात वेगानं विकसित होत असलल्या हरित द्रुतगती महामार्गामुळे आणि नियंत्रित प्रवेश असलेल्या महामार्गांमुळे रस्ते मार्गानं केलेल्या प्रवासाचं स्वरुप बदललं आहे. असं केंद्रीय रस्ते आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे.  मुंबई पुणे द्रुतगती महामार्गाच्या निर्मितीनंतर मुंबई पुणे विमान सेवा जवळजवळ बंद झाली होती. तसाच बदल आता दिल्ली डेहराडून आणि दिल्ली जयपूर महामार्गामुळे झाल्याचंही त्यांनी सांगितलं. ते काल नवी दिल्लीत अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्सनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. रस्ते बांधकामात नवनवीन संशोधनामुळे साधनसामुग्रीचा पुनर्वापर होतो, तसंच बांधकामाचा दर्जा सुधारतो असं ते म्हणाले.

- **- - होल्ड - गडकरी-**

भारतीय वाहन उद्योग जगात पहिल्या क्रमांकाचा करण्यासाठी सरकार प्रयत्न करत असल्याचं असोचेमतर्फे आयोजित नेतृत्व शिबिरात सांगितलं.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि कोरियाचे माजी सैनिक कल्याण विभागाचे मंत्री क्वोन ओह इल यांनी आज संयुक्तरित्या  सेओलच्या इमजीनग पार्क इथं भारतीय युद्ध स्मारकाचं

उद्घघाटन केलं. कोरियन युद्धाला ७५ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्तानं या स्मारकाची निर्मिती करण्यात आली आहे. कोरियन युद्धात भाग घेतलेल्या भारतीय लष्कराच्या रुग्णवाहिका सेवेमधील सैनिकांनी दिलेल्या हौतात्म्याच्या स्मरणार्थ हे युद्धस्मारक बांधण्यात आलं आहे. यावेळी संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी जागतिक शांतता आणि मानवतेच्या सेवेसाठी कोरियन प्रांतात भारतानं केलेल्या कार्याचं स्मरण केलं.

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्टमधून त्यांना आदरांजली वाहिली. उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनीही राजीव गांधी यांना आदरांजली वाहिली.

काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, पक्षाचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी, प्रियांका गांधी यांच्यासह अनेक नेत्यांनी आज राजीव गांधी यांचं स्मारक असलेल्या वीर भूमी इथं जाऊन आदरांजली वाहिली.

राजीव गांधी यांची प्रगतिशील विचारसरणी, देशाच्या एकतेसाठी दिलेले सर्वोच्च बलिदान आणि त्यांचा साधेपणा हे सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचं, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गहलोत यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

एबोलाचा प्रादूर्भाव झालेल्या देशांमधून येणाऱ्या प्रवाशांच्या बाबतीत दक्षता बाळगण्याचं आवाहन आरोग्य सेवा महासंचालनालयाने केलं आहे. डेमॉक्रेटिक रिपब्लिक ऑफ काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदान यासारख्या देशांमधून येणाऱ्या प्रवाशांनी एबोलाच्या लक्षणांशी साधर्म्य असणाऱ्या तक्रारी केल्यास त्यांना ताबडतोब वैद्यकीय मदत उपलब्ध करुन देण्याच्या सूचनांचाही यात समावेश आहे. ताप, डोकेदूखी, स्नायूदुखी, कारणाशिवाय रक्तस्त्राव किंवा उलटी अशी लक्षणे दिसल्यास प्रवाशांनी विमानतळ आरोग्य अधिकारी किंवा हेल्थ डेस्कला आधी सूचित करावं असं आरोग्य सेवा महासंचालनालयाने म्हटलं आहे. प्रवासानंतरही २१ दिवसांच्या आत अशी लक्षणे आढळल्यास वैद्यकीय मदत घ्यावी आणि आपल्या प्रवासाबाबत माहिती सार्वजनिक आरोग्य केंद्राकडे द्यावी असंही आवाहन संचालनालयाने केलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत भारताने क्षयरोगाच्या उच्चाटनासाठी जागतिक स्तरावरचा सर्वात मोठा क्षयरोग तपासणी आणि प्राथमिक रुग्ण शोध कार्यक्रम हाती घेतला आहे, असं प्रतिपादन केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी नड्डा यांनी केलं. जिनिव्हा इथे जागतिक आरोग्य परिषदेच्या ७९व्या सत्रात 'फुफ्फुसांच्या आरोग्याबाबत मंत्रीस्तरावरचे दृष्टीकोन' यावरच्या सत्रात ते बोलत होते. ज्यांना क्षयरोगाचा धोका जास्त आहे अशांपर्यत पोचण्यासाठी घराघरातून तपासणी करणारे मोबाईल तपासणी चमू, जनजागृती मोहिमा यावर या कार्यक्रमात भर दिला जात आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

सौंदर्य प्रसाधनांचा वापर औषध म्हणून इंजेक्शनद्वारे करण्यावर केंद्र सरकारने बंदी घातली आहे. केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटनेनं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलंय, की सौंदर्यप्रसाधनांचा वापर शरीरावर चोळून, ओतून, फवारुन किंवा शिंपडून केला जातो. सौंदर्य प्रसाधन क्लिनिक्स, सौंदर्यविषयक व्यावसायिक किंवा ग्राहकांनी ही प्रसाधनं शरीरात इंजेक्शनवाटे देऊ नये. या नियमाचा भंग केल्यास सौंदर्यप्रसाधन विषयक नियम २०२० नुसार कारवाई होऊ शकते.

सौंदर्यवर्धनासाठी, वृद्धत्व रोखण्यासाठी तसंच त्वचा गोरी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात इंजेक्शनवाटे सौंदर्य प्रसाधनं घेतली जात असल्याच्या पार्श्वभूमीवर सी.डी.एस.सी.ओ.ने हा इशारा दिला आहे.

<><><><><>

झारखंड प्रभारी पोलिस महासंचालकांच्या उपस्थितीत आज रांची इथं २७ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. हे सर्व सरकारने बंदी घातलेल्या सीपीआय-माओवादीशी संबधित होते अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. अनेक प्रकरणांमध्ये आरोपी असणाऱ्या या नक्षलवाद्यांनी 'ऑपरेशन नवजीवन' अंतर्गत शरणागती पत्करली आहे. एकूण नक्षलवाद्यांपैकी २२ जण चकमकीत मारले गेले आहेत, ४४ जणांना अटक झाली आहे तर २९ जणांनी या वर्षात आत्मसमर्पण केलं आहे असं नमूद करत शिल्लक राहिलेल्या थोड्या नक्षलवाद्यांनी मुख्य प्रवाहात यावं असं आवाहन पोलिस अधिकाऱ्यांनी केलं आहे.

<><><><><>

दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर चॉकेटलच्या पाकिटात लपवून आणलेलं सुमारे ३९६ ग्रॅम सोनं सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी जप्त केले. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार रियाधहून आलेल्या दोन प्रवाशांचा संशय आल्यानं त्यांच्या सामानांची तपासणी केली. त्यावेळी सामानात असलेल्या चॉकलेटच्या पाकिटांमध्ये  ३९६ ग्रॅम सोनं, पावडरच्या स्वरुपात लपवून ठेवल्याचं आढळून आलं. अधिकाऱ्यांनी हे सोनं जप्त केलं असून या दोघांविरोधात  गुन्हा नोंदवला आहे.

**<><><><><>**

आयपीएल स्पर्धेत आज अहमदाबादच्या नरेंद्र मोदी मैदानावर गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल.

**//<><><><><>//**